# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ०४/०५/२०२२ (बुधवार)**

**(दुपार)**

---

### जबर दुखापत

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १८ कि.मी. अंतरावरील दहेगाव येथे दिनांक ०३/०५/२०२२ चे १६.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— अनिल चैतराम देशमुख वय ३१ वर्ष रा दहेगाव ता. मौदा यांची शेती दहेगाव शिवारात असून फिर्यादीच्या शेतीला लागून आरोपी नामे— रमेश लक्ष्मण पालांदूरकर याची शेती आहे. फिर्यादी हे शेतावर हजर असता आरोपी याचे दोन बैल शेतातील धान खातांना दिसले. तेव्हा फिर्यादीने आरोपीस आवाज दिला आरोपीने येवून 'काय झाले किती, धान खाले' असे म्हणुन शिवागाळ करुन हातबुक्कीने मारहाण केली व जमिनीवर पाडले तसेच आरोपीने फिर्यादीला उजव्या मांडीला चावले त्यामुळे फिर्यादीच्या मांडीला रक्त लागले करीता सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ५०४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार येंगलवार मो.क्र. ९१२३२१९४२९ हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील बिना संगम अरविंद कोल डेपोट बिना येथे दिनांक ०३/०५/२०२२ चे ११.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— शिवनाथ भैयालाल लाडे वय २२ वर्ष, रा. वारेगाव वार्ड नं. ३ हा बिना संगम अरविंद कोल डेपोट येथे काम करीत असता मृतक नामे— महेन्द्र देवराव रंगारी हा बकऱ्या घेवुन चारन्याकरीता घेवुन यातील फिर्यादीचा फोनदवारे घरी परीवारासोबत बोलत असता अरविंद कोल डेपोवर वजन करन्याकरीता आलेला एमएच— ४०/एज— ३७९१ क्रमांकाचा ट्रैक्टरचा चालक नामे— राजु, रा. खापरखेडा याने आपले ट्रैक्टर निष्काळजीपणे मागे न पाहता चालवुन यातील मृतकाला धडक देवुन त्याचे छाती पोट व दोन्ही पाय जख्मी करुन त्याने मृत्युस कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३८, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक रेवतकर मो.नं. ९५४५५२३७३६ हे करीत आहे.

## जबरी संभोग

**पो.स्टे. सावनेर :–** दिनांक ०३/५/२०२१ चे १४.००ते २१.३० वा. सुमारास आरोपी क्र १. युवराज धनराज सोनटक्के वय ४० वर्ष रा.पहलेपार सावनेर ता सावनेर याने फिर्यादीला व तिचे पतीला 'तुमची भाची नेहमी बिमार राहते तिला उपचार करण्यासाठी आरोपी क्र २. मनोहर मारोतीराव कोल्हे वय ५५ वर्ष रा.हेटी ता सावनेर यांच्या कडे घेवून जा'. आरोपी क्र. १ ने आरोपी क्र २ याचे घरी फिर्यादी, तिचे पतीला व भाची (पीडित) यांना तांत्रीक उपचार करण्यासाठी घेवून गेला. तेव्हा पीडितेला आरोपी क्र २. याने लिंबू व कपूर डोक्याकडच्या भागात ठेवण्यास सांगून कमरीला काळा धागा बांधण्यास सांगीतले. आरोपी क्र १ व २ यांनी संगनमत करून फिर्यादीला व तिचे पतीला पीडितेला येथेच ठेवा असे सांगुन त्यांनी तिला आरोपी क्र २ यांचे घरी ठेवले. फिर्यादी व तिचा पती घरी परत आले पून्हा फिर्यादीचा पती व तिचा भाचा रात्री ९ वाजता पाहण्यास गेले असता आरोपीने दरवाजा उघडताच तो अर्ध नग्न अवस्थेत असल्याने मागच्या दारातून पळून गेला. फिर्यादीची भाची हिला विचार पूस केली असता तिने सागीतले की, 'आरोपी क्र १ याने तिची समती नसतांना जबरी संभोग केला व आरोपी क्र २ याने तिचा विनंयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३७६,३७६(जे),३७६ (एल),३५४,३५४ (ए),३४ भा.द.वी., कलम ४, ८,९ (के), ९(ग),१० बालकांचे लैगिंक अपराधापासुन संरक्षण अधि २०१२ सहकलम ३ महाराष्ट्र नरबळी आणि इतर आमानुष अनिष्ट आघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे समूळ उच्चाटण करण्याबाबत अधिनियम २०१३ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास म.स. पो. नि. सोनाली रासकर मो. नं. ९०८२१९६०८० या करीत आहे.

## गळफास लावून मृत्यू

**१) पो.स्टे. एमआयडीसी बोरी :–** अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील कटरे हाउसींग सोसायटी टाकळघाट येथे दि. ०२/०५/२२ चे २३.३० वा. सुमारास **राजन सुनिल वाळके (मृतक), वय २२ वर्ष रा. कटरे हाउसींग सोसायटी टाकळघाट** याने आपले राहते घरी कोणत्यातरी कारणावरून गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– जितेश अर्जुन ढेपे वय ३८ वर्ष रा. टाकळघाट यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार बन्सोड मो.न. ९६७३६०८६४२ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. अरोली :–** अंतर्गत कोदामेंढी येथे दि. ०३/०५/२२ चे ०९.०० वा. सुमारास **मेघराज भिमराव ठवरे (मृतक), वय ४० वर्ष रा. कोदामेंढी** याने अज्ञात कारणावरून आपले राहते घरी गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अनुपम भिमराव ठवरे वय २७ वर्ष, रा. कोदामेंढी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास मपोहवा मिनाक्षी गेडाम मो.न. ७७४५८०६१०५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**